मासिक

# सन्मार्गमित्र

**दर महिन्याच्या २५ तारखेला**
**प्रसिद्ध होणारे संस्थेचे मुखपत्र**

**वार्षिक वर्गणी**
**रुपये १००/-**



## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक

जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबलजवळ,
त्र्यंबकरोड, नाशिक : ४२२००२.
फोन : ०२५३-२३१३५९९
website : admsanstha.org
email : admnsk@gmail.com
sanmargmitra2018@gmail.com



**संपादक**

**सुभाष सबनीस**

**प्रकाशक**

**उदयकुमार मुंगी**

**संपादन सहाय्य**

**अजित चिपळूणकर, ॲड. समीर जोशी**
**प्रा. लक्ष्मीकांत भट, सौ. अश्विनी पेशकार**

सन्मार्गमार्ग हे मासिक मालक अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था यांच्यासाठी प्रकाशक उदयकुमार दत्तात्रय मुंगी यांनी रिप्लिका प्रिंटर्स, २, चिटको सेंटर, वकीलवाडी, नाशिक येथे छापून अखिल ब्राह्मण मध्यवर्ती जलशुद्धीकरण केंद्राजवळ, त्र्यंबकरोड, नाशिक : ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

*(या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक आणि अ.ब्रा. म. सहमत असेलच असे नाही.)*


## तिळगुळ घ्या गोड बोला...

स्नेह.. आपुलकी... प्रेम
याने टिकतात नाती

संक्रांतीच्या सणाला
तीळगुळाची महती

तीळाची स्निग्धता
गुळाचा गोडवा

कोणताही प्रसंग असो
तो सहकार्याने सोडवा!

**अखिल ब्राह्मण**
**मध्यवर्ती संस्था, नाशिक**

सर्व कार्यकारिणी सदस्य व सभासद

सं पा द की य

# वर्धापन दिन एक आनंद सोहळा...

वाढदिवस किंवा वर्धापन दिन हा प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा दिवस असतो. तसाच तो एखाद्या संस्थेच्या बाबतीतही असतो. अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक या संस्थेचा वर्धापन दिन असाच आनंदाचा सोहळा साजरा करीत आहे. २४ डिसेंबर १९७२ रोजी स्थापन झालेल्या या संस्थेने अनेक चढ-उतार पाहिले. अनेक थोरा-मोठ्यांचे आशीर्वाद या संस्थेला लाभले. या संस्थेच्या जन्माची कहाणी मोठी रोचक आहे. १९७० व १९७१ यावर्षी सांगली येथे ब्राह्मण समाजाचे मोठे अधिवेशन झाले होते. त्यावेळी असा विचार पुढे आला की, प्रत्येक शाखेच्या ब्राह्मण संस्था अनेक आहेत व त्या व्यवस्थित कार्यही करीत आहेत. परंतु आपण ब्राह्मण समाजातील शाखा भेद बाजूला ठेवून सर्वशाखीय ब्राह्मणांची एखादी संस्था जर राष्ट्रीय पातळीवर सुरू करता आली तर आपल्याला समाजाच्या उन्नत्तीसाठी प्रयत्न करणे सोपे होईल. या अधिवेशनासाठी आपल्या नाशिकमधील काही समाज कार्यकर्ते उपस्थित होते. त्यापैकी श्री. ढेकणे, नि.ह. कुलकर्णी हे प्रतिनिधी नाशिकला आल्यावर या संस्थेच्या पायाभरणीसाठी मागे लागले आणि १९७२ साली या अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेची स्थापना झाली. महाराष्ट्रातील सर्व शाखांच्या ब्राह्मण संस्था या संस्थेला जोडल्या गेलेल्या आहेत, असे संस्थेचे माजी अध्यक्ष नारायणराव नाईक यांनी सांगितले. मुंबई, पुणे, नाशिक येथील अनेक दिग्गज कार्यकर्त्यांनी ही संस्था मोठी करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या संस्थेचे कार्यालय सुरुवातीला तपस्वी वाड्यात होते. त्यानंतर आज आहे ती संस्थेची इमारत उभी राहिली. श्री. गणेश आण्णाजी नाईक यांना लहानपणी शिक्षणासाठी फार त्रास झाला. असा त्रास, अशी ससेहोलपट आपल्या समाजातील विद्यार्थ्यांची होवू नये म्हणून श्री. गणेश नाईक यांनी नाशिकला संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थी वसतिगृह सुरू केले. आजही ते सुरू आहे. संस्थेच्या अध्यक्षांची परंपरा फार मोठी आहे. पुणे येथील ज्येष्ठ साहित्यिक व दिग्दर्शक भालबा केळकर हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष. त्यानंतर श्री. माधवराव मराठे (पुणे), भाऊसाहेब काळे (पुणे) नारायणराव नाईक (उद्योजक, मुंबई), प्रभाकर पणशीकर (निर्माता दिग्दर्शक, मुंबई), श्री. नि. ह. कुलकर्णी (नाशिक), चंद्रशेखर जोशी (जुन्नर) अशा दिग्गजांनी या संस्थेचे अध्यक्षपद भूषविलेले असून सद्य:स्थितीत पुणे येथील ॲड. गणेश गोखले हे अध्यक्ष आहेत. संस्थेच्यावतीने अनेक उपक्रम राबविले जातात. संस्थेच्या वर्धापन दिनाच्या औचित्य साधून समाजातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा समाजगौरव पुरस्कार देवून सन्मान केला जातो व वर्धापन दिनाचा आनंद सोहळा साजरा करण्यात येत आहे. सर्व सभासद, हितचिंतक आणि वाचकांना संस्थेच्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

**-सुभाष सबनीस**



**मा. श्री. उद्धवजी ठाकरे**

मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य)



**मा. श्री. सतीश (नाना) कुलकर्णी**

महापौर, नाशिक मनपा



**मा. भिकूबाई बागूल**

उपमहापौर, नाशिक मनपा

**या मान्यवरांसह महाराष्ट्रातील मंत्रिमंडळाचे मन:पूर्वक अभिनंदन!**

**अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक**

# मकर संक्रांत

मकरसंक्रांत हा जरी अयन–वाचक सण असला, तरी हिंदू धर्मात त्याला अनेक दृष्टिकोनातून महत्त्व प्राप्त झाले आहे. मकरसंक्रांतीचे महत्त्व समजून घेऊया.

**मकरसंक्रांतीचे व्यावहारिक महत्त्व**

भारतीय संस्कृतीत मकरसंक्रांत हा सण आपापसातील कलह विसरून प्रेमभाव वाढवण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी प्रत्येक जीव 'तीळगूळ घ्या, गोड बोला' असे म्हणून जवळ येतो. या दिवशी इतरांना तीळगूळ देण्यापूर्वी देवाच्या समोर ठेवावा. त्यामुळे तीळगुळातील शक्ती आणि चैतन्य टिकून रहाते. तीळगूळ देतांना आपल्यात चैतन्य आणि वेगळाच भाव जागृत होतो. व्यावहारिक स्तरावरील जिवाला घरात असलेल्या वातावरणातील चैतन्याचा लाभ होतो. त्याच्यातील प्रेमभाव वाढतो. त्याला नकारात्मक दृष्टीकोनातून सकारात्मक दृष्टीकोनात जाण्यास साहाय्य होते.

**तीळगुळाचे महत्त्व**

तिळामध्ये सत्त्वलहरींचे ग्रहण अन् प्रक्षेपण करण्याची क्षमता अधिक असल्यामुळे तीळगुळाचे सेवन केल्याने अंतर्शुद्धी होऊन साधना चांगली होते.

**मकरसंक्रांतीचे साधनेच्या दृष्टीने महत्त्व**

मकरसंक्रांतीच्या दिवशी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचे वातावरण जास्त चैतन्यमय असते. साधना करणाऱ्या जिवाला या चैतन्याचा सर्वाधिक लाभ होतो. या चैतन्यामुळे त्या जिवातील तेजतत्त्व वृद्धींगत व्हायला साहाय्य होते. या दिवशी प्रत्येक जिवाने वातावरणातील रज–तम वाढू न देता अधिकाधिक सात्त्विकता निर्माण करून त्या चैतन्याचा लाभ करून घ्यावा. मकरसंक्रांतीचा दिवस साधनेसाठी अनुकूल आहे. त्यामुळे या काळात अधिकाधिक प्रमाणात साधना करून ईश्वर आणि गुरु यांच्याकडून चैतन्य मिळवण्याचा प्रयत्न करा.



**साधनेला अनुकूल काळ**

'संक्रांतीचा काळ हा साधनेला अनुकूल असतो; कारण या काळात ब्रह्मांडात आप, तसेच तेज या तत्त्वांशी संबंधित कार्य करणार्या ईश्वरी क्रियालहरींचे प्रमाण अधिक असते.'

**एका ब्रह्माकडे जाण्याचा मार्ग दाखवणे**

'संक्रांती ही मातीच्या घड्याचे पूजन आणि उपायन देण्याचा विधी यांद्वारे पाच तत्त्वांनी बनलेल्या जिवाच्या देहाद्वारे साधना करून त्रिगुणांचा त्याग करून द्वैतातून अद्वैतात, म्हणजे एका ब्रह्माकडे जाण्याचा मार्ग दाखवते.'

**प्रकाशमय कालावधी**

'या दिवशी यज्ञात हवन केलेली द्रव्ये ग्रहण

करण्यासाठी पृथ्वीवर देव अवतरित होतात. याच प्रकाशमय मार्गाने पुण्यात्मा पुरुष शरीर सोडून स्वर्गादी लोकी प्रवेश करतात म्हणून हा कालावधी प्रकाशमय मानला गेला आहे.

### तीळ-तांदूळ अर्पण करण्याचे महत्त्व

या दिवशी महादेवाला तीळ-तांदूळ अर्पण करण्याचे अथवा तीळ-तांदूळ मिश्रित अर्घ्य अर्पण करण्याचेही विधान आहे. या पर्वाच्या दिवशी तिळाचे विशेष महत्त्व मानले गेले आहे. तिळाचे उटणे, तीळमिश्रित पाण्याचे स्नान, तीळमिश्रित पाणी पिणे, तिळाचे हवन करणे, स्वयंपाकात तिळाचा वापर, तसेच तिळाचे दान हे सर्व पापनाशक प्रयोग आहेत; म्हणून या दिवशी तीळ, गूळ, तसेच साखरमिश्रित लाडू खाण्याचे, तसेच दान करण्याचे अपार महत्त्व आहे.

'जीवनात सम्यक् क्रांती आणणे', हे मकरसंक्रांतीचे आध्यात्मिक तात्पर्य आहे.

### मकरसंक्रांतीला दिलेल्या दानाचे महत्त्व

धर्मशास्त्रानुसार या दिवशी दान, जप, तसेच धार्मिक अनुष्ठान यांचे अत्यंत महत्त्व सांगितले आहे. या दिवशी दिलेले दान पुनर्जन्म झाल्यानंतर शंभरपटीने प्राप्त होते.

### प्राकृतिक उत्सव

हा प्राकृतिक उत्सव आहे, प्रकृतीशी ताळमेळ साधणारा उत्सव आहे. दक्षिण भारतात हे पर्व 'थई पोंगल' नावाने ओळखले जाते. सिंधी लोक या पर्वाला 'तिरमौरी' म्हणतात. महाराष्ट्रात तसेच हिंदी भाषिक 'मकरसंक्रांत' म्हणतात आणि गुजरातमध्ये हे पर्व 'उत्तरायण' नावाने ओळखले जाते.

### संकल्प बळाने शरशय्येवर पडून रहाणारे भीष्माचार्य

उत्तरायण पर्वाची वाट पहाणाऱ्या भीष्म पितामहांनी उत्तरायण चालू झाल्यानंतरच देहत्याग करणे पसंत केले होते. जगातील कोणत्याही योद्ध्याने शरशय्येवर अठ्ठावन्न दिवस काय अठ्ठावन्न घंटेही संकल्प बळाने जगून दाखवले नाही. ते काम भारताच्या भीष्म पितामहांनी करून दाखवले.'

### जीवनाकडे साक्षीभावाने पाहा

सूर्याच्या उत्सवाला 'संक्रांत' असे म्हणतात. कर्कसंक्रांतीनंतर सूर्य दक्षिणेकडे जातो आणि पृथ्वी सूर्याच्या जवळ, म्हणजे खाली जाते. यालाच 'दक्षिणायन' असे म्हणतात. मकरसंक्रांतीनंतर सूर्य उत्तरेकडे जातो आणि पृथ्वी सूर्यापासून दूर, म्हणजे वर जाते. यालाच 'उत्तरायण' असे म्हणतात. कोणत्याही ग्रहमालेतील कोणत्याही ग्रहाचे मध्यबिंदूकडे जाणे, म्हणजे 'खाली जाणे' आणि मध्यबिंदूपासून लांब जाणे, म्हणजे 'वर जाणे.' कर्कवृत्ताकडून मकरवृत्ताकडे जाणे, म्हणजे वरून खाली जाणे अन् मकरवृत्ताकडून कर्कवृत्ताकडे जाणे, म्हणजे खालून वर जाणे.

मकरसंक्रांत म्हणजे खालून वर चढण्याचा उत्सव; म्हणून तो महत्त्वाचा मानला आहे. पृथ्वीच्या सूर्याजवळ आणि सूर्यापासून दूर जाण्याचा जसा सूर्यावर काहीच परिणाम होत नाही, तसेच मानवाने त्याच्या जीवनात येणार्या चढउतारांकडे, सुख-दुःखांकडे समत्व दृष्टीने, साक्षीभावाने पहायला हवे, असाच संदेश मिळतो.

### मडक्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण

सूर्यदेवाने जास्तीतजास्त उष्णता देऊन पृथ्वीवरील बर्फ वितळवण्यासाठी साधना (तपश्चर्या) चालू केली. त्या वेळी रथाला असलेल्या घोड्यांना सूर्यदेवाची उष्णता सहन न झाल्याने त्यांना तहान लागली. तेव्हा सूर्यदेवाने मातीच्या मडक्यातून पृथ्वीवरचे पाणी खेचून (विहिरीतून घड्याने पाणी काढतात तसे) घोड्यांना प्यायला दिले; म्हणून संक्रांतीच्या वेळी घोड्यांना पाणी पाजलेल्या मडक्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मातीची मडकी पूजण्याची प्रथा चालू झाली. रथसप्तमीच्या दिवसापर्यंत सुवासिनी हळदीकुंकवाच्या निमित्ताने या पूजलेल्या मडक्यांचे वाण एकमेकींना भेट म्हणून देतात. याला काळच साक्षी आहे.'

**(सौजन्य : मायाजाल)**

# संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचा ४७ वा वर्धापन दिन २४ डिसेंबर २०१९ व २५ डिसेंबर २०१९ या दिवशी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

मंगळवार दिनांक २४ डिसेंबर रोजी संस्थेच्या प्रांगणात संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. उदयकुमार मुंगी यांच्या शुभहस्ते सकाळी ८.३० वाजता ध्वजारोहण होवून कार्यक्रमास प्रारंभ होईल. त्यानंतर १०.३० वाजता संस्थेच्या आवारातील विघ्नहर्ता गणेश मंदिरात श्री सत्यनारायणाची महापूजा श्री. व सौ. उल्हास पंचाक्षरी यांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आली आहे. सायंकाळी ५.०० वाजता स्वरवर्धन निर्मित भक्तीसंगीत आणि भावगीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. ॲड. सायली गोखले, सौ. शीतल पत्की, सौ. सुवर्णा बालटे व त्यांचे सहकारी हा कार्यक्रम सादर करणार आहेत. आपण सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

बुधवार दिनांक २५ डिसेंबर रोजी संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या समाज गौरव पुरस्कारांचे वितरण होणार आहे. नाशिकचे भूषण गोखले एज्युकेशन सोसायटीचे सचिव व महासंचालक सर डॉ. मो.स. गोसावी यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेतर्फे दरवर्षी समाजात विविध क्षेत्रात उत्तम कार्य करणाऱ्या व्यक्तींचा समाजगौरव पुरस्कार देवून यथोचित गौरव करण्यात येत असतो. यावर्षी धार्मिक परंपरा या विभागाग्तील पुरस्कार इंदोर येथील सद्गुरू भक्तराज महाराज यांचे उत्तराधिकारी व कांदळी येथील संस्थानचे प्रमुख प.पू. नंदूदादा कसरेकर महाराज यांना जाहीर झाला आहे. साहित्य व संगीत या विभागातील पुरस्कार पुणे येथील ज्येष्ठ साहित्यिक, गीतकार, लेखक श्री आनंद माडगूळकर यांना तर सामाजिक विभागातील पुरस्कार नाशिकस्थित ‘घरकुल’ परिवार संस्थेच्या संस्थापक व सचिव श्रीमती विद्याताई फडके यांना, वैद्यकीय क्षेत्रातील पुरस्कार ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ व समाजसेवी डॉ. भरत केळकर यांना, उद्योग क्षेत्रातील पुरस्कार पुणे येथील युवा उद्योजक व नगरकर ज्वेलर्सचे संचालक श्री. पुष्कर नगरकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेच्या वतीने ब्राह्मण सामाजाव्यतिरिक्त एका व्यक्तीचा पुरस्कार देवून सन्मान करण्यात येत असतो. यावर्षी सामाजिक सेवाभावी कार्य करणारे व नाशिकमधील किडनी विकारग्रस्तांचे आधारस्तंभ, ज्येष्ठ समाजसेवी मा. श्री. गुलशनकुमार चड्ढा यांना प्रदान करण्यात येणार आहे. नाशिकमधील सर्व नागरिकांना विनंती करण्यात येते की, आपण सर्वांनी या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# सन्माननीय पुरस्कारार्थींचा परिचय

**नाशिक : अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचा ४७ वा वर्धापन दिन २४ डिसेंबर २०१९ व २५ डिसेंबर २०१९ या दिवशी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त गौरवशाली काम करणाऱ्या समाजातील व्यक्तींना 'समाज गौरव पुरस्कार' देऊन प्रमुख अतिथींच्या हस्ते सन्मानीत करण्यात येणार आहे. याचे औचित्य साधून त्या सन्माननीय पुरस्कारार्थींचा थोडक्यात परिचय...**

**मा. सर डॉ. मो.स. गोसावी (शुभहस्ते)**

काही व्यक्ती अशा असतात की, त्या व्यक्तीचे नाव घेतलेल की, आपल्याला ती संस्था आणि त्यांचे कार्य डोळ्यासमोर उभे राहते. अशीच एक व्यक्ती म्हणजे सर डॉ. मो.स. गोसावी सर. सर्वात तरुण प्रिन्सिपल आणि तेही मोठ्या कालखंडासाठी म्हणजे 'यंगेस्ट प्रिन्सिपॉल वुईथ लाँगेस्ट टेन्यूअर' हे वर्ल्ड रेकॉर्ड त्यांच्या नावावर आहे. १९५८ ते १९९५ या ३७ वर्षे ते प्रिन्सिपॉल होते. ते गोखले एज्युकेशन सोसायटीचे सचिव व महासंचालक आहेत. पण वेदमूर्ती एस.जे. गोसावी इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रॉलॉजी ॲण्ड मॅनेजमेंट या संस्थचे अध्यक्ष आहेत. जेडीसी बिटको आयएनएसआर या संस्थेचे डायरेक्टर आहेत. मॅनेजमेंट कॉलेजचे प्रेसिडेंट आहेत. महाराष्ट्र कौन्सिल ऑफ एज्युकेशन ॲडमिनिस्ट्रेशन आणि मॅनेजमेंट या संस्थेचे प्रेसिडेंट आहेत.

अनेक शैक्षिणक संस्थांच्या गर्व्हर्निंग बॉडीचे सदस्य आहेत. पुणे विद्यापीठ एक्झिक्युटिव्ह या कौन्सिलचे सदस्य होते. सिनेटचे सदस्य आहेत. पी.एचडीचे गाईड आहेत. जागतिक कॉन्फरन्सकरिता त्यांनी युरोप, यूएसए, यूके, दक्षिण आफ्रिका यांसारख्या अनेक देशांत भारताचे प्रतिनिधीत्त्व केले आहे. दक्षिण आफ्रिकेतील एका जागतिक कॉन्फरन्समध्ये त्यांना 'मास्टर टीचर ऑफ दि मिलेनियम' या पुरस्काराने गौरविण्यात आले. पुण्यश्लोक सद्गुरू शिवपार्वती प्रतिष्ठानची स्थापना केली असून अनेक जणांना गौरविण्यात आले आहे. आपले वडील, शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी, एन.सी. मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली ॲस्ट्रॉलॉजी अभ्यास केला आहे. त्यांनी या विषयावरील काही पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत. जसे की, भविष्य मार्गदर्शिका. सरांना राजीव गांधी शांती पुरस्काराने १९९० मध्ये सन्मानीत केले आहे. समाजभूषण, शिक्षणमहर्षी, ज्ञानपीठ सन्मान, 'सर' हा तिकाब, समाजरत्न, भारत पुत्ररत्न असे अनेक सन्मान सरांना मिळालेले आहेत. १९७३ पासून आजपर्यंत ते गोखले एज्युकेशन सोसयटीचे सचिव आहेत. ही संस्था नाशिक, मुंबई, ठाणे, कोकण या विभागात कार्यरत असून ८० इन्स्टिट्यूट, २० सिनिअर कॉलेज, ३ रिसर्च इन्स्टिट्यूट, विद्यापीठाचे ३ ॲडव्हान्स सेंटर चालवत आहेत. १ लाख विद्यार्थी व ३००० कर्मचारी असलेली संस्था सर सांभाळत आहेत. स्कूल लेव्हलपासून युनिर्व्हसिटीपर्यंत फस्ट इन फस्टक्लास ही जागा सरांनी सोडलेली नाही. अशा या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाच्या शुभहस्ते हा समारंभ होत आहे.

***

**मा. श्री. आनंद माडगूळकर**

काही माणसे आपल्या आई वडिलांच्या नावाने ओळखली जातात की हा यांचा मुलगा. वडील खूप मोठे असले की, आपसूकच लोक वडिलांचा

नावानेच मुलाला ओळखतात; पण काही माणसे वडिलांच्या मोठेपणाचा आव न आणता आपले स्वत:चे नाव कमावतात. अशांपैकी एक व्यक्ती म्हणजे महाराष्ट्राचे लाडके लेखक गीतकार ग. दि. माडगूळकर यांचे चिरंजीव आनंद माडगूळकर हे होत. गदिमा आणि सुधीर फडके यांनी अजरामर केलेले गीत रामायण ते गेल्यानंतरही लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करणारे आनंद माडगूळकर. भारतात आणि परदेशात जवळपास सातशे प्रयोग करणारे आनंदजी गदिमांच्या गीतगोपाल, असा रंगला जोगिया, नाम घेता, अमर नगमे रफीके, महाराष्ट्राचा आठवा शाहीर, गदिमायन या कार्यक्रमांचे रंगमंचीय आविष्करणही करत आहेत. सह्याद्री, झी, ई, या वाहिन्यांवरूनही त्यांनी सादरीकरण केलेले आहे.

हे करत असतानाच त्यांनी ग.रा. कामात यांच्या समवेत, मै तुलसी तेरे आंगन कि, दो प्रेमी, निवडुंग आणि रेशीमगाठी या चित्रपटाच्या पटकथा-संवाद लेखनही केलेले आहे. वाट पहाते पुनवेची या चित्रपटाचे संपूर्ण लेखन त्यांनी स्वतंत्रपणे केले आहे. या बरोबरच आकाशाची फळे या दूरदर्शन मालिकेचे आणि 'वेग' या दूरदर्शन पत्राचे लेखनही त्यांनी केलेलं आहे.

हंस, मोहिनी, नवल, सुगंध, आवाज, जिप्सी, ग्रंकीत, किस्त्रीम, महाराष्ट्र टाइम्स, सामना, केसरी, सकाळ, या वृत्तपत्रात व मसिकामधून कथा व विविध विषयावर लेखन केलेलं आहे.

त्यांच्या स्वत:च्या मालकीच्या 'श्री फिल्म्स' या संस्थेच्या माध्यमातून अनेक अनुबोधपटांची निर्मिती त्यांनी केलेली आहे. जसे की, ज्ञानियाची ज्ञानेश्वरी, महाराष्ट्राची शाहिरी परंपरा, महाराष्ट्राची संगीत-नाटक परंपरा, प्रगतीच्या वाटेवर हे अनुबोधपट राज्याच्या माहिती व जनसंपर्क विभागाकरिता निर्माण केले. तसेच आदिवासी शिक्षण व संशोधन संस्थेकरिता 'मल्हार कोळी, कोलाम, गोंदण, भवाड्याचे मुखवटे, आहेरीचा दसरा, भिल्लांची होळी, आदिवासी सण आणि उत्सव', तसेच आरोग्य विभाकारीता 'आपुला आपण करू उद्धार, निश्चय, मला बाई जायाचं नांदायला', तसेच यशदासाठी कार्पोरेट, पंढरीची वाट, फाईलयात्रा, जी सरकार, डोळे उघडाल ती सकाळच' त्याचप्रमाणे डॉ. जाल मेहता, पुतळ्याच्या देशा, स्वरतीर्थ सुधीर फडके, शिवयोगी राजा या अनुबोधपटाची निर्मिती केलेली आहे. रेडिओकरिता रोटरी अंतरंग, गीतरामायणाचे रामायण, श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकरांची प्रवचने, हृदयापासून हृदयापर्यंत या सिरीयल्सची निर्मिती केलेली आहे. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या आनंद माडगूळकरांना अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचा सादर नमस्कार.

***

**मा. परमपूज्य नंदू दादा कसरेकर**

आपल्या नाशिकला ज्यांची समाधी आहे त्या वेडेबाबांचे कुटुंबीय. संपूर्ण भारतात ज्यांचा मोठा भक्त परिवार आहे, असे परमपूज्य सद्गुरू भक्तराज महाराज यांचे उत्तराधिकारी, इंदोर येथे भक्तराज महाराजांचा मोठा आश्रम आहे. भजन, भोजन आणि भ्रमण या त्रिसूत्रीवर भक्तराज महाराजांनी कालक्रमणा केली. त्याचाच पाठपुरावा करीत नंदुदादा या त्रिसूत्रीवर कार्य करीत आहे. भक्तराज महाराजांनी अनेक आश्रमांची निर्मिती केली त्यापैकी एक म्हणजे आपल्या महाराष्ट्रातील जुन्नर तालुक्यातील श्रीक्षेत्र कांदळी येथील श्री रामचंद्र देव भक्तराज महाराज समाधी ट्रस्ट व सद्गुरू सेवा मंडळाचे कार्य एक प्रमुख विश्वस्त या नात्याने नंदू दादा सांभाळत आहेत.

भजन, भोजन व भ्रमण या त्रिसूत्रीनुसार गावोगावी भ्रमण करून भक्तराज महाराज यांचे कार्य चालवीत आहे. नंदूदादा यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक सेवा प्रकल्प, शैक्षणिक सेवा प्रकल्प आणि वैद्यकीय सेवा प्रकल्प तसेच अन्नदान व पोषक आहार प्रकल्प राबविला जात

आहे. गरीब, आदिवासी, व गरजू लोकांना कपडे पुरविण्याचे कार्यही नंदूदादांच्या मार्गदर्शनाखाली चालते. पर्यावरण रक्षणार्थ, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन प्रकल्प राबवणारे नंदू दादा आजच्या काळातील एका थोर संत परंपरेचे पाईक म्हणून काम करीत आहेत. त्यांना अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या वतीने सादर प्रणाम.

***

**मा. श्रीमती विद्या आनंद फडके.**

वेगळ्या वाटेवर प्रवास करणारे जे काही मोजके समाजसेवी आहेत त्यापैकी एक म्हणजे आपल्या नाशिकचे वैभव असलेल्या श्रीमती विद्याताई फडके. प्रौढ, मानसिक अपंगाच्या पुनर्वसनासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या विद्याताई म्हणजे आपल्या नाशिकचा मान, आभिमान नव्हे तर नाशिकला पडलेले एक सुंदर स्वप्न आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. १९७८ पासून २०११ पर्यंत विद्याताई प्रबोधिनी ट्रस्टच्या व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरच्या प्रिन्सिपॉल म्हणून काम करत होत्या. या काळात विजयाताईंनी अनेक प्रौढ मानसिक अपंग मुलाना अनेक कौशल्याची कामे शिकवून त्यांना कामाची संधी उपलब्ध करून दिली. अनेक मुलांना कारखान्यांमध्ये नोकरीला लावले.

एखाद्या घरात जर विशेष मूल असले तर त्या पालकांची अवस्था काय असते याचा विचार आपण न केलेलाच बरा! अशा मुलांसाठी आपले सगळे आयुष्य खर्ची करणाऱ्या विजयाताईंना सलाम. निवृत्त झाल्यावरसुद्धा या मानसिक अपंग मुलींच्या समस्यांवर त्या विचार करत होत्या व त्यातूनच उभी राहिली 'घरकुल' परिवार संस्था. मानसिकदृष्ट्या अपंग असलेल्या मुलींचे पालक वृद्ध झाल्यावर या मुलींचे कसे होईल, याची चिंता पालकांना असतेच; पण अशा विशेष मुलीच्या पालकांची चिंता दूर केली ती या 'घरकुल परिवारा'ने. या पालकांच्या मृत्युनानंतर या मुलीना सांभाळण्याचे अवघड काम ही घरकुल परिवार संस्था करते.सुरुवातीला चार मुलींसाठी सुरू केलेल्या या संस्थेत आज ५४ मानसिक अपंग मुली राहात आहेत. या सर्व मुली १८ ते ६५ या वयोगटातील आहेत. अगदी पुणे, मुंबई ते चंद्रपूर, गडचिरोली या भागातून आलेल्या या मुली येथे सुखने आपले जीवन जगत आहेत ते फक्त विद्याताईच्या दूरदृष्टीमुळे. फक्त मुली आणि महिलांसाठी चालवली जाणारी ही एकमेव अशी पहिली संस्था आहे. या संस्थेला कोणतेही सरकारी अनुदान मिळत नाही. समाजाच्या योगदानावर चालणारी ही संस्था आपल्या नाशिकपासून ८ /१० किलोमीटर अंतरावर आहे. विजयाताईंच्या या हिमालयाएवढ्या कामाला अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचा मानाचा मुजरा.

***

**मा. डॉ. भरत रामकृष्ण केळकर**

आपण पाहातो समाजात अनेक प्रकारचे व्यवसाय करणारे, नोकरी करणारे अथवा विविध प्रकारची कार्ये करणारी माणसे असतात. त्यात काही माणसे अशी असतात की, ते कोणत्याही व्यवसाय करत असो, नोकरी करत असो, आपली समाजाप्रती असलेली बांधिलकी विसरत नाही. नाशिक शहरामध्ये अशा काही व्यक्ती आहेत त्यांनी आपल्या व्यवसायाची छाप समाजमनावर पाडली आहे. त्यातीलच एक व्यक्ती, वैद्यकीय व्यवसाय करीत असूनही समाजसेवेचे व्रत त्यांनी स्वीकारलेले आहे, असे सन्माननीय डॉक्टर भरत केळकर. नाशिकमध्ये ज्या मोजक्या डॉक्टरांचा व्यवसाय अतिशय उत्कृष्ट चालतो व ज्यांना आपल्या व्यवसायातून वेळसुद्धा मिळत नाही त्यापैकी डॉ. भरत केळकर यांचा वरचा नंबर लागतो. आपला पेशा सांभाळून ते 'आयाम'सारख्या सांस्कृतिक चळवळीचे अध्यक्ष आहेत. नाशिकमध्ये ज्या तीन–चार मोठ्या शैक्षणिक संस्था आहेत त्यापैकी एक असलेल्या नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे ते सक्रीय सभासद आहेत. त्यांची नुकतीच या

संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झालेली आहे. ते नाशिकच्या मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. घरकुल परिवार या संस्थेचे ते विद्यमान पदाधिकारी आहेत. वनवासी कल्याण आश्रम पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून ते काम पाहत आहे.

संकटकाळी/युद्धजन्य परिस्थितीमध्ये सर्वसामान्य जनतेला काही त्रास झाला तर त्यांना वैद्यकीय मदत करणारी Doctors without borders/ Medecins Sans Frontieres (MSF) एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे त्या संस्थेचे Registered volunteer म्हणून भरत केळकर हे काम करतात. या संस्थेच्या माध्यमातून २०१४ च्या जून-जुलै या महिन्यात जॉर्डन आणि सीरियाच्या सीमेवर त्यांनी आपली सेवा दिलेली आहे. त्याचप्रकारची सेवा २०१६ मध्ये येमेनच्या मोहिमेवर तर १८/१९ या वर्षांत इराकमधील मोसूल येथे आपली सेवा दिलेली आहे.

नाशिकमध्ये १९८४ पासून ते आपला वैद्यकीय व्यवसाय करीत असून दरवर्षी निवृत्तीनाथ यात्रेच्या दरम्यान मोफत आरोग्यसेवा पुरवीत आहेत. जव्हार-मोखाडा या आदिवासी तालुक्यात पोलिओमुळे आलेल्या अपंगत्वाचे ऑपरेशन कॅम्प १९८७ व १९८८ या वर्षी आयोजित केले होते. वनवासी कल्याण आश्रम या आदिवासी विभागात कार्य करणाऱ्या संस्थेशी डॉक्टर जोडलेले आहेत. सिक्कीम आणि महाराष्ट्रातील आदिवासी विभागात आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरात त्यांनी सक्रीय सहभाग घेतलेला आहे. त्यांच्या हॉस्पिटलच्या तळघरात आदिवासी विभागात कार्य करणाऱ्या आरोग्य सेवकांना ट्रेनिंग दिले जाते. निवृत्तीनाथ यात्रेसाठी वारीला येणाऱ्या भाविकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व पटावे म्हणून 'निर्मलवारी' आयोजनात गेले दोन वर्षापासून सहभाग घेत आहेत. वैद्यकीय सेवेबरोबरच केईम हॉस्पिटल मुंबई, एनडीएमव्हीपीचे मेडिकल कॉलेज येथे लेक्चरर, प्रोफेसर म्हणून काम केले आहे. न्यूयॉर्क येथील हॉस्पिटलमधील फेलोशिपसुद्धा डॉक्टरांना मिळालेली आहे. याशिवाय ते पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी एक्झामिनर म्हणून काम करतात. अशा या सेवाभावी डॉक्टरानां अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचा सलाम.

***

**मा. श्री. पुष्कर वल्लभ नगरकर**

एखादा व्यावसायिक आपला व्यवसायाच्या माध्यमातून मोठा होत असतो; पण त्याच्या मोठेपणामागे असलेले परिश्रम व त्याग हे प्रत्येकाला दिसत नाही. पुणे येथील नगरकर ज्वेलर्सचे मालक व युवा उद्योजक श्री. पुष्कर वल्लभ नगरकर हे त्यापैकीच एक!

श्री. पुष्कर यांनी पुणे येथे आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर आपल्या वडिलांच्या व्यवसायाशी निगडित शिक्षण घेण्यासाठी बँकॉक व जयपूर येथे जेमोलॉजी म्हणजे रत्नपरीक्षांत प्रावीण्य मिळविले. विशेष म्हणजे शालेय शिक्षण सुरू असतानाच त्यांनी आपल्या व्यवसायात लक्ष घालण्यास सुरुवात केली. अकॅडेमिक व व्यावसायिक शिक्षणानंतर त्यांनी आपल्या व्यवसायात पूर्णत्वाने झोकून दिले. कारण पुष्कर लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे अचानक निधन झाले. त्यांची आई श्रीमती स्वाती नगरकर यांनी पती निधनानंतर प्रथमच घराबाहेर पडून आपला व्यवसाय पाहण्यास सुरुवात केली. थोडक्यात आपली आई हीच त्यांची प्रथम व्यवसाय गुरू होती. याबरोबरच त्यांचे काका हे पुष्कर यांच्यासाठी व्यवसाय शिक्षणाचे विद्यापीठ ठरले. म्हणजेच आई व काका यांच्या मार्गदर्शनाखाली पुष्कर यांनी आपला व्यवसाय वृद्धिंगत व्हावा यासाठी अतोनात परीश्रम घेतले. पुष्कर यांच्या या वाटचालीत त्यांच्या मातोश्री श्रीमती स्वाती नगरकर यांच्या मेहनतीचे व त्यागाचे मोठे योगदान आहे. कारण दोन मोठ्या मुली व पुष्कर यांचे पालनपोषण व व्यवसायातली कोणतीही माहिती नसताना व कौटुंबिक विरोध

असतानाही आपल्या दीराच्या पुरोगामी विचारांच्या मदतीने त्यांनी हा व्यवसाय मोठा केला आहे.

व्यवसाय करताना हवे असणारे सर्व बारकावे पुष्कर यांनी आत्मसात केले आहे. आपले कर्मचारी, कारागीर व सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे येणारा ग्राहक या दोन्ही पातळ्यांवर समन्वयाची भावना ठेवून त्यांनी आपला व्यवसाय वृद्धिंगत केला आहे व करीत आहे. आपल्या आई-वडिलांचे संस्कार, काकांकडून मिळालेला वारसा व एकूणच व्यावसायिक व्यक्तीच्या अंगी असणारे गुण यामुळे श्री. पुष्कर नगरकर यांना अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या वतीने युवा उद्योजक म्हणून देण्यात येणारा समाज गौरव पुरस्कार प्रदान करताना आम्हाला आनंद होता आहे. श्री पुष्कर यांचेकडून यशाची अनेक शिखरे पादाक्रांत होवोत, याच सदिच्छा.

***

**मा. गुलशनकुमार चड्ढा**

किडनी विकारग्रस्तांचा जीवनदाता म्हणून ओळखले जाणारे श्री गुलशनकुमार चड्ढा

मृत्यू जेव्हा चोरपावलांनी येतो, तेव्हा निदान मन सावरता येते. एक अटळ वास्तव म्हणून त्याचा स्वीकार करता येतो; पण तोच मृत्यू जेव्हा थंड पावलांनी येतो, तेव्हा मन आणि शरीर पोखरत आपले पाश घट्ट करीत मरणालाच जागवू पाहतो. तेव्हाची तगमग शब्दांपलीकडची असते. किडनी विकाराने ग्रस्त रुग्णांची स्थिती नेमकी अशीच असते. दारात यमदूत उभा असतो आणि सुरू होते एक निकराची झुंज... त्यांच्या या लढाईत निःस्वार्थ भावनांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून रुग्णांवर उपचार करून जगवितो तो असतो डॉक्टर... म्हणूनच रुग्णांना डॉक्टरांमध्ये देव दिसतो. परंतु, डॉक्टर नसताना एखादी व्यक्ती रुग्णांना जगण्याचे बळ देते त्यावेळी त्यांच्यासाठी ती व्यक्ती निश्चितच देवमाणूस असते. नाशिकमधील गुलशनकुमार चड्ढा त्यातीलच एक...

नाशिक डायलिसिस सपोर्ट फाउंडेशनच्या माध्यमातून ते हजारो किडनी विकारग्रस्त रुग्णांसाठी आधारस्तंभ बनले आहेत. महागड्या खर्चामुळे हताश होऊन मध्येच डायलिसिस सोडून देऊन मृत्यूला कवटाळू पाहणाऱ्या रुग्णांना मानसिक आधार आणि नाममात्र शुल्कात डायलिसिसची सेवा उपलब्ध करून देत त्यांच्यात जगण्याची नवी उमेद चड्ढा यांनी निर्माण केली आहे. १९९६ साली हिंदुस्थान एरोनॉटिक्स कंपनीतून चीफ इंजिनिअर म्हणून निवृत्त झाल्यानंतर गुलशनकुमार चड्ढा नाशिकच्या सिव्हिल हॉस्पिटलमधील गरजू रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाइकांना विनामूल्य जेवणाची सोय अन्न सेवा समितीमार्फत करीत होते. त्याचवेळी त्यांना किडनी निकामी झालेल्या रुग्णांची हेळसांड जाणवली. आठवड्यातून दोन-तीन वेळा डायलिसिस करावे लागायचे. एका डायलिसिसचा खर्च दोन-तीन हजार रुपये... त्यामुळे किडनी निकामी झालेल्या रुग्णाला महिन्याकाठी ३५ ते ४० हजार रुपये खर्च येतो. उपचारासाठी लागणारा हा अवाढव्य खर्च, प्रवास खर्च व मानसिक-शारीरिक ताणतणाव यामुळे बहुतांश रुग्ण मध्येच उपचार सोडून देऊन मृत्यूला आपलंसं करीत होते. यामळे गुलशनकुमार चड्ढा अस्वस्थ झाले. किडनी विकाराने ग्रस्त रुग्णांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे, असे त्यांनी ठरविले.

सुरुवातीला मुंबईहून जीवनज्योत ड्रग बँकेकडून अल्पदरात किडनी पेशंटला डायलिसिससाठी लागणारे डायलायझर, ट्यूबिंग सेट आणि औषधे उपलब्ध करून दिली. गुलशनकुमार चड्ढा यांच्याकडे अत्यंत अल्प दरात औषधे रुग्णांना मिळत असल्यामुळे किडनी पेशंट दूर-दूर भागांतून त्यांच्या घरी येऊ लागले आणि त्यांच्या घरालाच दवाखान्याचे स्वरूप प्राप्त झाले. हीच वेळ त्यांच्या मनाला उभारी देणारी ठरली. आपण स्वतःच किडनी पेशंटसाठी डायलिसिसची सेवा का देऊ

नये? मनात विचार आला खरा, पण वयाची सत्तरी पार केलेल्या गुलशनकुमार चड्ढा यांच्यासाठी डायलिसिस सेंटर सुरू करणे महत्प्रयासाचे काम होते. ते अस्वस्थ झाले. त्यांची ही तळमळ, अस्वस्थता इंजिनिअर असलेला त्यांचा मुलगा राम यांनी ओळखली. राम चड्ढा यांनी डायलिसिस सेंटर सुरू करण्याचा चंगच बांधला आणि २०१२ साली नरसीभाई पटेल यांना सोबत घेऊन नाशिक डायलिसिस सपोर्ट फाउंडेशनची स्थापना केली.

अत्यंल्प दरात महागडी डायलिसिस सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे. आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक असलेल्या रुग्णाकडून तर पैसेही घेतले जात नाहीत. डायलिसिसची साधनसामग्री, प्रशासकीय स्टाफचे मानधन, वीज आणि पाणी यांवर महिन्याला पाच लाख रुपये खर्च होतो; पण गुलशनकुमार, राम चड्ढा, नरसीभाई पटेल आणि शेखर खोंड यांनी त्यांचे संपूर्ण जीवन किडनी रुग्णांसाठी वेचले आहे.

आज १९ डायलिसिस मशिनच्या सहायाने महिन्याला ७०० हून अधिक डायलिसिस करीत असून, रुग्णाची जीवनज्योत अखंड तेवत ठेवली आहे. सध्या ८२ वर्षीय गुलशनकुमार चड्ढा यांचा कामाचा उत्साह तरुणांना लाजवेल असा असून, ते रोज पेशंटची विचारपूस करण्यासाठी सेंटरमध्ये येतात. पत्नीची किडनी निकामी झाली म्हणून तिला वाऱ्यावर सोडून देणाऱ्या पतीबद्दल ते तीव्र संताप व्यक्त करतात. परंतु, माणुसकीचा झरा सतत वाहत असलेल्या चड्ढा यांनी त्या असहाय महिलेला स्वतःची मुलगी मानून ते तिचा सांभाळ करीत आहेत.

रुग्ण सेवा करण्यासाठी तुम्हाला डॉक्टरच व्हावे लागेल, असे नव्हे किंवा तुम्ही डॉक्टर झाले तरच रुग्णांना तुमचे देवरूप दिसेल असेही नाही. गुलशनकुमार चड्ढा आणि नाशिक डायलिसिस सपोर्ट फाउंडेशन यांनी हे जगाला दाखवून दिले आहे. त्यांच्या कार्याला अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्यावतीने हृदयापासून प्रणाम!

***

---


# पंचवटी केंद्रात 'युवास्पंदन' कार्यक्रम

**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या पंचवटी केंद्राच्या वतीने युवास्पंदन २०१९ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पंचवटी केंद्राच्या वतीने सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. आपल्या समाजातील तरुण पिढीचे भविष्य उज्ज्वल व्हावे यासाठी यावा पिढीशी संवाद साधण्याचा प्रयत्न या निमित्ताने करण्यात आला.

नाशिक शहरातील अनेक युवक-युवती या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी युवकांना नोकरी व व्यवसाय मार्गदर्शन करण्यात आले. जवळपास २० ते २५ युवकांना नोकरी उपलब्ध असल्याचे या प्रसंगी उपस्थित असलेल्या उद्योजक आणि व्यापारी यांनी सांगितले. ज्यांना कोणाला गरज असेल त्याना लगेचच नोकरी मिळावी यासाठी हा युवास्पंदन उपक्रम यशस्वी झाले, असे म्हणता येईल. याप्रसंगी श्री. प्रशांत जोशी, श्री. मनोज जोशी, श्री. प्रशांत पाठक व सावर्डेकर मॅडम यांनी युवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रारंभी संस्थेचे कार्यवाह श्री. अजित चिपळूणकर, सहकार्यवाह श्री. गंगाधर कुलकर्णी आणि कार्यकारिणी सदस्य श्री. सुभाष सबनीस यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वृषाली घोलप यांनी केले तर आभार सौ. सुचेता भानुवंशे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री उल्हास पंचाक्षरी, प्रदीप भानुवंशे, चंद्रशेखर जोशी, चंद्रशेखर गायधनी, संजय कुलकर्णी अद्वैत देशपांडे, महेश व ईशा बोरगावकर, सतीश जोशी यांनी प्रयत्न केले.

# पुणे केंद्राचा वर्धापनदिन सोहळा उत्साहात

**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या पुणे केंद्राच्या वर्धापनदिन आणि पुरस्कार वितरण सोहळा रविवार दिनांक ५ जानेवारी २०२० रोजी सायंकाळी ४.४५ वाजता लोकमान्य सभागृह, केसरीवाडा, नारायण पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. यावर्षी संगीत सेवा पुरस्कार पार्श्वगायक मा.श्री. जितेंद्र अभ्यंकर यांना तर रंगकर्मी पुरस्कार ‘तुझ्यात जीव रंगला’ या मालिकेतील अभिनेत्री सौ. धनश्री काडगावकर यांना देण्यात येणार आहे. सुप्रसिद्ध मुलाखतकार श्री. सुधीर गाडगीळ यांचा विशेष पुरस्कार देवून यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. पीतांबरी उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. रवींद्र प्रभूदेसाई हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असतील. यावेळी ‘मुलखांवेगळी माणसं’ या कार्यक्रम मा. श्री सुधीर गाडगीळ सादर करणार आहे, अशी माहिती केंद्रप्रमुख श्री. मकरंद माणकीकर, कार्यवाह श्री. मनोज तारे आणि सांस्कृतिक प्रमुख श्री. विश्वनाथ भालेराव यांनी दिली आहे.





**पुणे : पुणे केंद्राच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र सुरू करण्यात आले. त्याचे हे बोलकी छायाचित्रे.**



## जाहिरात दरपत्रक

| प्रकार | आकार | दरमहा | वार्षिक |
|---|---|---|---|
| **रंगीत** | पूर्णपान १९x२५ सेमी | ५०००.०० | ५००००.०० |
| | अर्धपान १९x१२ सेमी | २५००.०० | २५०००.०० |
| | पावपान ९x१४ सेमी | १५००.०० | १५०००.०० |
| **कृष्णधवल** | पूर्णपान १९x२५ सेमी | २५००.०० | २५०००.०० |
| | अर्धपान १९x१२ सेमी | १५००.०० | १५०००.०० |
| | पावपान ९x१४ सेमी | १०००.०० | १००००.०० |
| **शुभेच्छा** | पावपान १९x२ सेमी | ५००.०० (कृष्णधवल) | |

## सूचना

जाहिरातीचे आर्टवर्क ‘सीडीआर’ किंवा ‘पीडीएफ’ फॉर्मेटमध्ये संस्थेचा मेल आयडी sanmargmitra2018@gmail.com वर पाठविणे किंवा समक्ष संस्थेच्या कार्यालयात आणून देणे.

# फलटण केंद्रात बक्षीस वितरण समारंभ

**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या फलटण केंद्राचा १९ वा वर्धापनदिन आणि गीता जयंती बक्षीस समारंभ  असा एकत्रित कार्यक्रम शनिवार दिनांक १४ डिसेंबर २०१९ रोजी फलटण येथील महाराजा मंगल कार्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी नाशिक येथील गीताव्रती व संत साहित्याच्या अभ्यासिका सौ. अनघा चिपळूणकर होत्या. त्यांचे पती व संस्थेचे कार्यवाह श्री. अजित चिपळूणकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. केंद्राच्या वतीने गीताजयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या गीतेच्या दुसऱ्या अध्यायामधील ३७ ते ७२ या नंबरच्या श्लोक पाठांतर स्पर्धा आयोजित केली होती. लहान गट आणि मोठा गट अशा दोन विभागात ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसोबतच 'संस्कार.. आजची गरज' या विषयावर वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्हीही स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या स्पर्धकांचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. समाजातील सर्व जाती-धर्माच्या स्पर्धकांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. ही स्पर्धा  डॉ. कै. व्ही. बी. सिधये यांच्या प्रेरणेने सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची




यशस्वीता आणि आयोजन पाहून संस्थेचे ज्येष्ठ सदस्य श्री. विलासकाका दाणी यांनी केंद्राला पंचवीस हजार रुपयाची देणगी दिली आहे. श्री. व सौ चिपळूणकर दाम्पत्याने नुकतीच पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण केली आहे. यानिमित्ताने त्यांनी आपल्या नर्मदा परिक्रमेचे अनुभव कथन केले. या कार्यक्रमाला फलटण केंद्राचे सर्व पदाधिकारी तसेच स्पर्धक व शहरातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## निधन वार्ता

श्री गोविंद रंगनाथ करजगीकर यांचे दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या नाशिक केंद्रप्रमुख श्री. सतीश करजगीकर यांचे ते बंधू होते.

### भावपूर्ण श्रद्धांजली

**इंजि. व्ही.एम. कुलकर्णी**
**गिरीश कुलकर्णी**

**

**नलिनी प्रकाश जोशी, पुणे**
**ज्योती प्रकाश भूधर**
(सचिन पाडेकर यांच्या सासूबाई)
**यादव सदाशिव ठोसर**
(अनिल नांदुर्डीकर यांचे मेव्हणे)

# विघ्नहर्ता वधु-वर सहायक मंडळ



संस्थेच्या वतीने सर्वसमावेशक अशी विघ्नहर्ता विवाह मंडळ या नावाने एक अतिशय उत्कुष्ट अशी वेबसाईट तयार करण्यात आली आहे. या वेबसाईटच्या सहाय्याने कोणत्याही जाती-धर्माचे लोक अनुरूप असे वधु-वर संशोधन करू शकतील. या वेबसाईटचे वैशिष्ट्य असे आहे की, आपण अगदी मोबाईलवरसुद्धा या वेबसाईटचा वापर करू शकता. या वेबसाईटवर आपले नाव नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणारी फीसुद्धा आपण मोबाईलच्या माध्यमातून भरू शकता. अशा सर्व सोयीनी युक्त अशा मराठी व इंग्रजी भाषेची सोय असलेली ही वेबसाईट प्रत्येकासाठी उपयोगी ठरणार आहे. ज्यांची नोंदणी करावयाची असेल त्याचे **आधारकार्ड** या ठिकाणी आपणास पाहावयास मिळेल. म्हणजेच या वेबसाईटवर नोंदणी झालेल्या इच्छुकांची माहिती आपल्याला तपासून पाहाणे सोयीचे होईल. अशी सोय असलेली ही पहिलीच वेबसाईट असावी. सर्व सभासद तसेच सर्व जाती-धर्माच्या नागरिकांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येकाने या वेबसाईटला भेट द्यावी व आपल्याला आवश्यक ती माहिती भरून वधु-वर संशोधन करावे ही नम्र विनंती.

वेबसाईट **www.abms.vignhartamatrimoni.com**

या वेबसाईटला भेट दिल्यानंतर आपल्याला ही वेबसाईट वापरण्यास किती सोपी व स्वस्त आहे ते समजेल. प्रत्येकाने एकवेळ या वेबसाईटला अवश्य भेट द्यावी ही विनंती.

***अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था व समाज सहाय्यक संस्था, नाशिक संचलित***

**विघ्नहर्ता वधु-वर सहाय्यक मंडळ : vighnahartamatrimony.com**

ही वेबसाईट सर्व जाती-धर्मियांच्या वधु-वरांकरिता सुरू करण्यात आली असून इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

## ऑफलाईन नाव नोंदणीसाठी संपर्क


नाशिक : ०२५३-२३१३५९९
नाशिक (पंचवटी) : ७९७२२४२१६५
पुणे : ०२०-२४४३६९२२
जुन्नर : ९९७५६०३७७६
फलटण : ९८६०७२८६९८/९४२१८८१५६३
निरा (पुरंदर) : ९८२३३२६६८४

## वेबसाईटवर नोंदणी फक्त ऑनलाईनच करता येणार असून त्याचे दर खालीलप्रमाणे

**३ महिन्यांकरिता : १०००/-**
**६ महिन्यांकरिता : २०००/-**
**१ वर्षासाठी : ३०००/-**
**१ वर्षानंतर नूतनीकरणास : १०००/-**



## ‘सन्मार्ग मित्र’ लेखन पाठविण्याकरिता सूचना



१. राजकिय विषय सोडून कोणत्याही प्रकारचे लिखाण पाठवावे.
२. लिखाण कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहिलेले अथवा टाईप केलेले असावे.
३. ब्राह्मण समाजातील विविध संस्था कार्यरत आहेत. त्यांनी आपआपल्या संस्थांच्या कार्यक्रमाचे वृत्तांत मुद्देसुद पाठविल्यास त्या लिखाणाला प्राधान्य देण्यात येईल.
४. प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंयत लिखाण संस्थेच्या कार्यालयात पोहोचेल या बेताने ते पाठवावे.
५. मासिकाच्या ध्येय धोरणाला अनुसरुन लिखाणामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार संपादकांनी राखून ठेवला आहे.
६. लिखाण स्वीकृत अगर अस्वीकृत करणे संपादकांच्या अधिकारात राहिल. अग्राह्य लिखाणास कारण देण्याचे बंधन संपादकांवर नाही. तसेच लिखाणास कोणतेही मानधन दिले जाणार नाही.
७. मासिकात व्यक्त होणाऱ्या मतांशी संस्था किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही.

## विनम्र आवाहन

१. संस्थेच्या सर्व सभासदांनी आपला बदललेला अथवा नवीन पत्ता, फोन नंबर, मेल आयडी इत्यादी संस्था कार्यालयात येऊन अथवा पत्राद्वारे अपडेट करावा ही विनंती.
२. ब्राह्मण समाजातील सर्व जाती, पोट जातीच्या समाजबांधवांनी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे सभासद व्हावे ही नम्र विनंती. (आजीव सभासद वर्गणी रु. ५०१/- मात्र) सभासदत्वाचा अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असून आपले ओळखपत्र, निवासाचा पत्ता व एक फोटोसह विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयात भरून द्यावा.

## संस्थेची केंद्र कार्यालये

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक केंद्र

केंद्र प्रमुख : सतीश करजगीकर मो. :९०९६७०५४०७
जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबल जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक - ४२२ ००२. फोन : २५७२३२६

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पंचवटी, नाशिक

केंद्र प्रमुख : श्री. प्रदिप भानुवंशे मो. : ७९७२२४२१६५
घर नं. ४४७७, भानुवंशे वाडा, भोंडे गल्ली, कपालेश्वर मंदिरामागे, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे केंद्र

प्रभारी केंद्र प्रमुख : मकरंद माणकीकर
‘कौशिक’, १२९३, सदाशिव पेठ, पुणे -३०.
फो : ०२०-२४४३६९२२. मो. ९७६३१९१२००

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, जुन्नर केंद्र

केंद्र प्रमुख : श्री. हरीष शांताराम भवाळकर
मो. : ९८८१६६६१९५०
बेलवलकर सभागृह, बुधवार पेठ, जुन्नर, जि. पुणे

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नीरा केंद्र

केंद्र प्रमुख : श्री. दत्तात्रय त्रिंबक बडबडे. मो. : ९८२३३२६६८४
समर्थ बंगला, बाजार तळ, मराठी शाळे मागे, नीरा, ता. पुरंदर जि. पुणे

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, फलटण केंद्र

केंद्र प्रमुख : श्री. भालचंद्र दत्तात्रय ताथवडकर.
मो. : ९८६०७२८६९८.
११८, कसबा पेठ, फलटण, जि. सातारा

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, शिरवळ केंद्र

केंद्र प्रमुख : ॲड. अमृत बाळकृष्ण मोने. मो. : ९८६०५ ४०९८६ । शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा.